# इतना सन्नाटा क्यूं है?

संपादकीय

जयश्री खाडिलकर-पांडे

नरेंद्र मोदी हे दणदणीत बहुमताने विजयी झाले. या निकालानंतर उमेदवारांनी आपापला जल्लोष केला. परदेशात सुखान्वये जगणाऱ्या भारतीयांनी उत्सव साजरा केला. पण या निकालापासून संपूर्ण देशात एक प्रकारची गूढ शांतता पसरली आहे. रस्त्यांवर, गल्लीबोळात, चौकात, शिवारात, पारा खाली कुठेही उत्साह नाही आणि उन्मादही नाही. निकाल लागला आणि उमेदवारांच्या विजयी मिरवणुकांनंतर कार्यकर्तेही थंड झाले. कुणी निकालाची चर्चाच करीत नाही. बाजूनी बोलणारे गप्प आहेत आणि विरोधात बोलणारे शांत आहेत. मोदींच्या विजयाची इतकी लाट उसळल्यावर अचानक देश जणू मौन झाला आहे. या वातावरणात 'शोले' चा एकच डायलॉग आठवतो, इतना सन्नाटा क्यूं है भाई?

या सन्नाट्याचे एकच कारण आहे म्हणजे जनतेलाच या निकालाचा धक्का बसला आहे. 'भाजपा सत्तेवर येणार, पण कमी जागा मिळतील' या मानसिकतेत सर्व होते. त्यामुळे भाजपाला एकदम ३५० सीट मिळाल्याचे पाहून सर्वांचाच मानसिक गोंधळ उडाला आहे. २०१४ ची मोदी लाट सर्वांना दिसली होती, जाणवली होती. त्यामुळे २०१४ सालचा निकाल सर्वांना अपेक्षित होता. पण यावेळी मोदी लाट कुणालाही दिसली नव्हती. जाणवली नव्हती, त्याचे बुडबुडे कुणीही बघितलेही नव्हते, सुप्त लाटेचे संकेतही नव्हते. एकदम निकाल जनतेच्या मनावर थेट आदळला आणि 'हे कसं शक्य आहे' म्हणत जनता या तडाख्याने मौन झाली. आम्ही ज्याच्याशी बोलत होतो तो मोदी सरकारमुळे त्रस्त होता, वैतागला होता, तरीही भाजपा सरकारच येईल असे वाटत होते, पण इतक्या सीट? हा प्रश्न एकमेकांना विचारून सर्वजण गप्प होतात. या निकालाचे विश्लेषण काय करायचे हे सामान्य माणसाला कळत नाही आणि तज्ज्ञांनाही जमत नाही अशी स्थिती आहे. पुढील पाच वर्षे जे घडेल ते पाहायचे या मानसिकतेत जनता गेली आहे.

बेकारी, महागाई, भ्रष्टाचार, ढासळलेली आर्थिक स्थिती हे मूळ मुद्दे यावेळी प्रचारातच नव्हते. मग काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत पसरलेल्या या बहुरंगी आणि बहुढंगी देशाने राष्ट्रवाद आणि हिंदुत्त्वाला पूर्ण महत्त्व देऊन भरभरून मतदान केले का हा प्रश्न आहे. जातीवर मतदान करणाऱ्या या देशातून जातीयवाद उखडून टाकण्याचा प्रयत्न अनेकजण कसोशीने करीत असताना जातीयवादाची जागा 'धर्म' घेतो आहे अशी भीती वाटू लागली आहे. धर्म हे आचरण आहे, विचार आहे. संवेदना आहे. त्यावर माणसाचा जीवनक्रम ठरावा, पण देशाचे भवितव्य ठरवता येत नाही. परंतु यावेळी हिंदू आणि मुस्लिम दोन्ही धर्म निवडणुकीच्या रणांगणात यशस्वी ठरले. हे का घडते आहे हेच भारताच्या जनतेला उमगेनासे झाले आहे. पण हा मार्ग धोक्याचा आहे इतके या जनतेला समजते आहे म्हणूनच ही जनता सुन्न आहे.

आबाद नहीं, बर्बाद नहीं
गाता हूँ खुशी के गीत मगर
जखमोंसे भरा सीना है मेरा
हंसती है मगर, ये मस्त नजर
दुनियां मैं तेरे तीर का
या तकदीर का मारा हूँ।

अशा मनःस्थितीत जनता आहे. या स्थितीतून जनता लवकर बाहेर पडून 'आरे ला कारे' करील इतकीच अपेक्षा आहे.